CNR: MHSI05-000016-2018

**नियमीत दिवाणी मुकदमा नं. १/२०१८ मधील निशाण नं. १० वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांचे मार्फत दाखल करण्यात आला असुन त्याचे मते प्रतिवादी ट्रस्ट ही नोंदणीकृत ट्रस्ट आहे. तो ट्रस्ट उपप्रादेशिक कार्यालय सिंधुदुर्ग यांचेकडे सार्वजनिक विश्वस्त देवस्थान नोंदणी पुस्तकातील क्र. बी–६ सिंधुदूर्ग येथे नोंदविण्यात आली आहे. त्यानंतर वक्फ बोर्डची स्थापना झाल्या नंतर सदर ट्रस्टची कागदपत्रे सहाय्यक धर्मादिकारी आयुक्त सिंधुदूर्ग यांनी औरंगाबाद येथील वक्फ बोर्ड यांच्याकडे नोंदणीसाठी पाठविला आहे. सबब प्रतिवादी ट्रस्टच्या मालकीची किंवा व्यवस्थेची कोणतीही इमारत किंवा कार्यक्रमाबाबत या न्यायालयात दाद मागता येणार नाही असे त्यांचे म्हणणे आहे. सबब त्या बाबतचा प्राथमिक मुद्दा काढावा अशी मागणी त्याने केली आहे.

२. या अर्जास वादीतर्फे म्हणणे सादर करण्यात आले असून त्याच्या मते ट्रस्टची कागदपत्रे औरंगाबाद येथे नोंदणीकरीता पाठविलेबाबत कोणताही पुरावा समोर आलेला नसल्यामुळे प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्याने केली आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. या क्षणी दाव्यामध्ये दाखल असलेले कागदपत्र पाहिले. या गोष्टीमुळे कोणताही वाद नाही की प्रतिवादी हे नोंदणीकृत ट्रस्ट आहे. सबब वक्फ कायदयाखाली या न्यायालयाचे अधिकारक्षेत्र बाधीत होते किंवा कसे ही गोष्ट ठरविणे मला आवश्यक वाटते. कारण दावा मिळकतीमध्ये जरी दर्ग्याचा उल्लेख ७/१२ वरती नसला तरी कागदपत्रे जसे दर्ग्याचा अर्ज, लाईट बिल, नजिर अब्दुल शेख या इसमाने दाखल केलेले कॅव्हेटची प्रत, नगरपालिकेची पावती यांचा उहापोह केला असता दावा मिळकतीमध्ये दर्गा आहे असे प्रथमदर्शतः दिसते. सबब त्यास अनुसरुन इतर नमुद केल्याप्रमाणे वक्फ बोर्ड खाली या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राला बाधा येते किंवा कसे ही गोष्ट ठरविणे गरजेचे आहे आणि त्यासाठी प्राथमिक मुद्दा निश्चीत करणे मला आवश्यक वाटते. सबब मी खालील आदेश पारित करतो.

Whether this court has jurisdiction to try and entertain this suit?

हा प्राथमिक मुद्दा निर्धारीत करण्यात येतो. दोन्ही बाजुंनी त्याबाबतचा पुरावा सादर करावा.

सही/–
(वि.द.पाटील)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.

दिनांक– ०४/०१/२०१८